नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २३२ Issue - 232 | वार बुधवार दि. ८ जानेवारी २०२५ Blow- Wednesday Date 8 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### 'भरपाई टाळण्यासाठी कायद्याचे बेधडक उल्लंघन'; राज्य सरकारी अधिकाऱ्यांवर न्यायालयाचे ताशेरे

नवी दिल्ली : 'मूळ जमीन मालकांना भरपाईपासून वंचित ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारमधील अधिकाऱ्यांनी निर्लज्जपणे कायद्याचे उल्लंघन केले आहे,' अशा शब्दांत ताशेरे ओढताना सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी व्याजासह भरपाई करण्याचे आदेश बीड जिल्हा परिषदेला दिले आहेत. २० वर्षांपूर्वी अधिग्रहित झालेल्या जमिनीशी संबंधित हे प्रकरण आहे. २००५ साली बीड जिल्ह्यातील जांभळखोरी भोरफडी गावात रोजगार हमी योजनेंतर्गत पाण्याची टाकी बांधण्यासाठी या जमिनीचे सक्तीने अधिग्रहण करण्यात आले होते. मूळ जमीन मालकांना व्याजासह नुकसानभरपाई देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात जिल्हा परिषदेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सोमवारी न्या. सूर्य कांत आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळून लावताना महाराष्ट्र सरकारच्या अधिकाऱ्यांची तीव्र शब्दांत कानउघाडणी केली. हे प्रकरण महाराष्ट्राच्या सरकारी अधिकाऱ्यांनी ज्या पद्धतीने हाताळले, ते बघून आम्ही पूर्णपणे निराश झालो आहोत, असे न्यायालयाने सुनावले. 'जमिनीचे अधिग्रहण जिल्हाधिकाऱ्यांनी केले असल्यामुळे भरपाईची जबाबदारी जिल्हाधिकारी/राज्य सरकारची आहे,' असा युक्तिवाद जिल्हा परिषदेच्या वकिलांनी केला. मात्र यावर 'तुम्ही राज्य सरकारपासून वेगळे आहात का?' असा प्रश्न करत न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या या भूमिकेवर ताशेरे ओढले. ग्रामस्थांना आजपर्यंतच्या व्याजासह नुकसानभरपाईची १ कोटी ४९ लाखांची रक्कम न्यायालयाद्वारे निर्धारित केलेल्या अनुकरणीय खर्चासह अदा करण्यासाठी आवश्यक मंजुरी देण्याचे आदेश न्यायालयाने राज्याचे मुख्य सचिव तसेच वित्त विभाग आणि ग्रामविकास विभागांच्या प्रधान सचिवांना दिले. ग्रामस्थांना महिनाभरात नुकसानभरपाई दिली गेली नाही, तर दोषी अधिकाऱ्यांकडून प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात यावा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते.

# देशमुख हत्येच्या मारेकऱ्यांना सोडणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ; संतोष देशमुखांचे कुटुंबीय मुख्यमंत्र्यांच्या दारी, केली न्यायाची मागणी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोरता कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने एसआयटी देखील स्थापन करण्यात आली आहे.

यादरम्यान आज संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर मुख्यमंत्र्यांबरोबर नेमकी कोणत्या मुद्द्यावर चर्चा झाली याबद्दल संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी माहिती






दिली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी कोणीही असला तरी त्याला सोडणार नसल्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे धनंजय देशमुख यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांची मुंबईत भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात जे सांगितलं होतं, तेच आश्वासन आम्हाला दिलं आहे. आरोपी असणाऱ्या कोणालाही सोडणार नाही, जे आरोपी आहेत त्यांना शिक्षा दिली जाईल. महाराष्ट्राला यातून एक उदाहरण पाहायला मिळणार आहे, इथे गुन्हेगारांना माफ केलं जात नाही आणि तसं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे.

आम्ही त्यांच्याबरोबर या सगळ्या प्रकरणाची चर्चा केली, आज कुठलंही निवेदन दिले नाही. आमच्याकडे काही ऑफिशीयल गोष्टी होत्या त्या मुख्यमंत्र्यांना दाखवल्या. आम्हाला न्याय पाहिजे तो कसा मिळणार याबद्दल आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितलं, असेही धनंजय देशमुख पुढे बोलताना म्हणाले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खरा सूत्रधार कोण? हे समोर आले पाहिजे अशी मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर या प्रकरणाच्या तपासासंबंधी बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, आम्ही ज्या एफआयआर आहेत त्याप्रमाणे आम्ही मुख्यमंत्र्यांशी बोललो. त्यानंतर घटना घडली त्या कालावधीमधील सर्वांचे सीडीआर काढा आणि त्याप्रमाणे सर्व तपास करा असेही मुख्यमंत्र्यांना सांगितले.

गेल्या चार-पाच महिन्यातील एफआर आहेत, ते एकमेकांशी कसे जुळतात याबद्दल तसेच आतापर्यंत झालेल्या तपासाचा अहवाल मिळण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली, दोन दिवसात जो तपास झाला आहे त्याचा अहवाल आपल्याला मिळेल असेही धनंजय देशमुख यावेळी म्हणाले.

### गुन्हेगारांना शिक्षा होणार

**निष्पक्षपातीपणे या गुन्ह्यामध्ये तपास झाला पाहिजे अशी भूमिका आपण देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडली आणि मुख्यमंत्र्यांनी ही मागणी मान्य केल्याचेही धनंजय देशमुख म्हणाले. या गुन्ह्यामध्ये कोणीही असले तरी त्याला शिक्षा होणार असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

# डॉ. व्ही. नारायणन इस्त्रोचे नवे प्रमुख

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बंगळुरू : भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोचे (खडठज) नवे प्रमुख म्हणून डॉ.व्ही.नारायणन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १४ जानेवारी रोजी डॉ.व्ही.नारायणन हे इस्रोचे विद्यमान प्रमुख डॉ.एस. सोमनाथ






### १४ जानेवारीला स्वीकारणार पदभार

यांच्याकडून इस्रोचे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. डॉ.व्ही.नारायणन हे सध्या लिक्विड प्रोपल्शन सिस्टीम सेंटर (डझडउ) चे संचालक आहेत. डॉ.एस. सोमनाथ हे त्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून १४ जानेवारी रोजी निवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागेवर आता डॉ.व्ही.नारायणन यांच्या नियुक्तीची घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे.

डॉ.व्ही.नारायणन यांनी भारतीय अंतराळ संस्थेत (इस्रो) विविध महत्त्वाच्या पदांवर काम केलेलं आहे. लिक्विड प्रोपल्शन सिस्टीम सेंटरच्या संचालक पदाच्या संपूर्ण कार्यकाळात डॉ.व्ही.नारायणन यांच्या मार्गदर्शनाखाली इस्रोच्या विविध मोहिमांसाठी १८३ लिक्विड प्रोपल्शन सिस्टम्स आणि कंट्रोल पॉवर प्लांट्स वितरित करण्यात आले आहेत. डॉ.व्ही.नारायणन हे इस्रोमधील जेष्ठ शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी जवळपास चार दशके इस्रोत अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केलेलं आहे.

तसेच रॉकेट आणि स्पेसक्राफ्ट प्रोपल्शन यामध्ये ते तज्ञ आहेत. त्यांनी ऋडङत चड्ढ खखख च्या ३२५ क्रायोजेनिक प्रकल्पाचं प्रकल्प संचालक म्हणून काम केलेलं आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ३२५ स्टेज यशस्वीपणे विकसित केलं गेलं. या बरोबरच डॉ.व्ही.नारायणन यांनी आदित्य अंतराळयान आणि ऋडङत चड्ढ-खखख मिशन्स आणि चांद्रयान-२ आणि चांद्रयान-३ च्या मोहिमेमध्ये देखील त्यांनी महत्वाचं योगदान दिलेलं आहे.

**डॉ.व्ही.नारायणन यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेलं आहे. त्यांना आयआयटी खरगपूरकडून रौप्य तर स्ट्रोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाने त्यांना सुवर्णपदक देऊन गौरवलेलं आहे. तसेच एनडीआरएफकडून त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे.**

भारतीय अवकाश संशोधन क्षेत्रातील त्यांचं योगदान अतुलनीय असून त्यांचा अनुभव आणि नेतृत्व क्षमता इस्रोला पुढे जाण्यास महत्वाची ठरणार आहे.

# अर्थव्यवस्थेची वाढ मंदावणार! विकासदर ६.४ टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



नवी दिल्ली : विद्यामान २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ६.४ टक्क्यांपर्यंत मंदावेल, असे केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या पहिल्या अग्रिम अंदाजाने स्पष्ट केले. हा गेल्या चार वर्षांतील सर्वात कमी विकासदर राहणार असून, रिझर्व्ह बँकेने अलीकडेच व्यक्त केलेल्या ६.६ टक्क्यांच्या सुधारित अंदाजापेक्षाही तो कमी आहे. वाढीचा दर मंदावणार असला तरी जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था हे बिरुद भारताकडून कायम राखले जाणार आहे.

'एनएसओ'ने जारी केलेल्या पहिल्या अग्रिम अंदाजानुसार, विकासदर करोनापश्चात चार वर्षांत प्रथमच ७ टक्क्यांच्या खाली येण्याची शक्यता आहे. मागील आर्थिक वर्षात (२०२३-२४) सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) वाढीचा दर ८.२ टक्के नोंदवला गेला होता. त्या तुलनेत यंदा तब्बल १.८ टक्क्यांची घसरण अंदाजण्यात येत आहे. विद्यामान आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ६.७ टक्क्यांची वाढ नोंदवणारी चांगली कामगिरी अर्थव्यवस्थेने केली. तर दुसऱ्या म्हणजेच जुलै ते सप्टेंबर तिमाहीत विकासदर दोन वर्षांच्या नीचांकी ५.४ टक्क्यांपर्यंत घसरला. मुख्यत: शहरी ग्राहकांची घटलेली मागणी आणि उत्पादन तसेच खाणकाम क्षेत्राच्या सुमार कामगिरीने अर्थव्यवस्थेची वाढ खुंटवणारा परिणाम केला आहे.

ताज्या आकडेवारीनुसार पहिल्या सहामाहीत सरासरी ६ टक्के दराने अर्थव्यवस्थेत वाढ झाली असून दुसऱ्या सहामाहीत तिला उभारी मिळणार असली तरी ती सरासरी ७ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेली महत्त्वाची अर्थनिदर्शक आकडेवारीदेखील संमिश्र कल दर्शविणारी आहे. सरलेल्या डिसेंबरमध्ये सेवा क्षेत्रातून चार महिन्यांतील उच्चांकी सक्रियता दिसून आली असली, तरी उत्पादन क्षेत्राची वाढ १२ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर गेली आहे. एकीकडे 'युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस' अर्थात यूपीआय संलग्न देयकांची संख्या वाढती राहिली आहे. तरी वस्तू आणि सेवाकर (जीएसटी) वाढ तीन महिन्यांतील नीचांकी पातळीवर रोडावली आहे.

# दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान, ८ फेब्रुवारीला निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाने दिल्ली विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक आज दुपारी २ वाजता पत्रकार परिषदेत जाहीर केले. ७० आमदार असलेल्या दिल्ली विधानसभेचा कार्यकाळ २३ फेब्रुवारी रोजी संपणार आहे. दरम्यान निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केल्यानंतर दिल्लीत आचारसंहिता लागू झाली आहे. दिल्लीत ५ फेब्रुवारीला मतदान पार पडणार आहे. तर ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे.

यावेळी नाव न घेता राजीव कुमार यांनी उद्धव ठाकरेंना खडे बोल सुनावले आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुका जाहीर करताना मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी, ईव्हीएम मधील छेडछाड, मतदार याद्यांमधील घोळ आणि वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीवर करण्यात आलेले सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. यावेळी त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी शेवटच्या पाच तासांत मतदानाची टक्केवारी कशी वाढली याबाबतही स्पष्टीकरण दिले.

दिल्ली विधानसभेची निवडणूक जाहीर करताना निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, ईव्हीएममध्ये कोणत्याही त्रुटीचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे ईव्हीएममध्ये व्हायरस किंवा बग असण्याचा तसेच मतमोजणीमध्ये काही छेडछाड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. देशातील उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने सातत्याने हेच सांगितले आहे की, ईव्हीएम टेम्परिंगचे आरोप निराधार आहेत. असं राजीव कुमार म्हणाले. दरम्यान राजीव कुमार यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंवर टीका केली. आरोप करताना हवेत गोळीबार करण्याची गरज नाही. तुम्ही पुरावा दाखवा, या ठिकाणी असं घडून येतं आहे हे सांगा आम्ही कारवाई करु. मागच्या म्हणजेच महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या दरम्यान एक हो हल्ला पाहण्यास मिळाला. तो म्हणजे आमचं हेलिकॉप्टर तपासत आहात, त्यांचं का नाही तपासलं? यांचं का नाही तपासलं? घाणेरड्या भाषेचा उपयोगही केला गेला. आम्ही उत्तर दिलं नाही संयम ठेवला. मतदानाच्या ठिकाणी असलेल्या अधिकाऱ्यांना धमक्या देण्यापर्यंत काहींची मजल गेली. मात्र आम्ही शांत बसलो. स्टार प्रचारक आणि राजकीय नेते यांनी शिष्टाचार आणि सभ्यता पाळली पाहिजे. महिलांच्या विरोधात बोलू नका, मुलांच्या विरोधातही काहींनी भाष्य केलं. अशा लोकांना आमची हात जोडून विनंती आहे की प्रचाराची पातळी एवढी घसरु देऊ नका की त्यामुळे मतदानाला येण्याची नव्या पिढीची इच्छाच निघून जाईल. प्रचाराच्या वेळी शालीनता ठेवली पाहिजे. असं म्हणत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता त्यांना खडे बोल सुनावले आहेत.

## मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला आदेश — मुख्यमंत्र्यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे साधला संवाद

# सर्वसामान्यांना सरकारी कार्यालयांत सुविधा देणे बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना आज सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला.

**नागरिकांचे स्थानिक पातळीवर सुटू शकणारे प्रश्न, समस्या तालुका, जिल्हा स्तरावरच सोडवावेत. पण असे होत नसल्याने मंत्रालयात गर्दी होते. यासाठी लोकशाही दिन सारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले जावेत, असे अधिकाऱ्यांना या बैठकीत सांगण्यात आले आहे. राज्यातील विविध ठिकाणी गुंतवणुकीसाठी उद्योजक येतात. त्यांना कसलाही आणि कोणाकडूनही त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारीही अधिकाऱ्यांची असल्याचे सांगण्यात आले आहे. हे केवळ उद्योग विभागाचे काम नाही तर क्षेत्रीय अधिकारी यांचेही काम आहे.**

यावेळी त्यांनी राज्यातील प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सविस्तर सूचना दिल्या. या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांमध्ये, कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करणे, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करणे, शासकीय कार्यालयांची स्वच्छता करणे, अनावश्यक कागदपत्रे काढून टाकणे आणि खराब व वापरात



नसलेली वाहने निर्लेखित करणे यांचा समावेश आहे.

यासह शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छ प्रसाधनगृहे उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही केल्या आहेत. यासाठी अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी पाण्याची उपलब्धता ते प्रासधनगृहे स्वच्छ दिसले पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी घेता किमान दोन सुधारणा, नाविन्यपूर्ण उपक्रम अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात राबवावेत असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. याचबरोबर प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, यासाठी प्रयत्न करण्यासही सांगितले आहे. अधिकारी नागरिकांना कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.

इज ऑफ वर्किंगसाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांचे अधिकारी आणि उद्योजक यांच्याशी संवाद साधावा, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुचित केले आहे. जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रम आणि योजनांना या अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या पाहिजेत. तसेच तालुका, गाव पातळीवर भेटी झाल्याच पाहिजेत. या अधिकाऱ्यांनी शाळा, अंगणवाडी आणि आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या पाहिजेत व याचे वेळापत्रक निश्चित करण्यात यावेत, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. संबंधित जिल्हा पालक सचिवांनी आपल्या जिल्ह्यात आज देण्यात आलेया सूचनांची अंमलबजावणी केली जात आहे का याबाबत लक्ष ठेवावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### सात कलमी कार्यक्रम

सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना आज सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सविस्तर सूचना दिल्या. या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांमध्ये, कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करणे, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करणे, शासकीय कार्यालयांची स्वच्छता करणे, अनावश्यक कागदपत्रे काढून टाकणे आणि खराब व वापरात नसलेली वाहने निर्लेखित करणे यांचा समावेश आहे. यासह शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छ प्रसाधनगृहे उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही केल्या आहेत. यासाठी अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी पाण्याची उपलब्धता ते प्रासधनगृहे स्वच्छ दिसले पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी घेता किमान दोन सुधारणा, नाविन्यपूर्ण उपक्रम अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात राबवावेत असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. याचबरोब प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, यासाठी प्रयत्न करण्यासही सांगितले आहे. अधिकारी नागरिकांना कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिर मनुष्यबळ पुरवठा कामाचा रक्षक सिक्युरिटी सर्विसेस अँड सिस्टीम प्रा.लि., पुणे यांचा ठेका रद्द

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरला आवश्यकतेनुसार आऊट सोर्शिंग पद्धतीने कुशल अर्थ कुशल व कुशल कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक असल्याने विविध प्रक्रिया राबवून ई-निविदा राबवण्यात आली होती, त्याममध्ये रक्षक सिक्युरिटी सर्विसेस अँड सिस्टिम्स प्रा.लि. पुणे यांची निविदा मंजूर होऊन दिनांक ४ जुलै २०२४ रोजी कामगारांना करण्यात आला होता, तथापि त्यांच्याकडून करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन होत नसल्याने त्यांचा ठेका रद्द करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

मनुष्यबळ/कर्मचारी पुरवठा कामांमध्ये वारंवार नोटीस देऊनही त्या संदर्भात योग्य तो खुलासा व सुधारणा होत नसल्याने दिसून आले होते तसेच त्यांच्या या कामाबाबत विविध प्रकारच्या लेखी तक्रारी देखील प्राप्त झाल्याबद्दल यावर मंदिर समितीच्या दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजीच्या सभेत चर्चा होऊन संबंधित पूर्वधारकास अंतिम नोटीस देऊन त्यांच्याकडून लेखी खुलासा घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करण्याची ठरले होते त्यानुसार संबंधित कंपनीला अंतिम नोटीस देण्यात आली होती त्यावर त्यांनी सदर केलेल्या खुलासा वस्तुस्थितीला धरून व समाधानकारक नाही.

मंदिर समितीने माहे फ ेब्रुवारी २०२४ मधील समितीतील कुशल व अर्थ कुशल व कुशल कर्मचारी पुरवठा करणे कामी ई निविदा मागवण्यात आल्या होत्या त्याची अंदाज प्रक्रिया रक्कम रुपये चार कोटी ५० लाख होती या प्रक्रियेत बाळापुरवठाधारकाने सहभाग घेतला होता त्यामध्ये रक्षक कंपनीचा ठेकेदार मंजूर झाला होता.

रक्षक कंपनीने नियुक्त केलेले कर्मचारी हे भावी भक्तांना धक्काबुक्की करतात व त्यांना दखलून देतात व भाविकांशी नम्रतेने न वागणे कर्मचारी आय कार्ड व गणवेश परिधान करीत नाही नेमून दिलेली सेवा व्यवस्थितपणे पाडणे मंदिरात प्रवेश करणाऱ्या गेटवर भाविकांची तपासणी न करता मोबाईलवर मंदिरात देऊन करारातील अटी शर्तीचा भाग करणे व २५ २५ पैकी फक्त दोन माजी सैनिक नियुक्त करून करारातील अटीचा भंग केला व कर्मचाऱ्यांना पेमेंट स्लिप न देणे कर्मचाऱ्यांना चांगले प्रशिक्षण न देणे सुरक्षा विभागातील कर्मचारी कंपनीच्या बोधचिन्ह असलेले गणवेश वापरत नाहीत व सेवेच्या ठिकाणी मोबाईल वापरणे व इतर अनुषंगिक गैरवर्तन करीत असल्याच्या बाबी अनेक वेळा निदर्शनास आलेले आहेत याबाबत अनेक वेळा लेखी मौखिक सूचना करूनही सुधारणा झाली नाही तसेच नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत आला न करणे कर्मचाऱ्यांना दोन नग गणवेश न देणे पुरवठा आदेशापेक्षा जास्त कर्मचारी नियुक्त करून दिलाची मागणी करणे याबाबत मंदिर समितीने संस्थेविरुद्ध अनेक वेळा कारणे दाखवा नोटीस बजावून समज देऊन ही सुधारणा होत नसल्याने तसेच वर नमूद अन्यकारणाने करारानुसार दंडात्मक कारवाई वेळोवेळी केली होती.




तथापि त्यासंदर्भात सुधारणा अथवा कोणतीच कार्यवाही झाली नाही सेवा पुरवठा कालावधीच्या एक वर्षातील सहा महिने होऊन देखील सुधारणार नाही व यापुढे देखील सुधारणा होईल असे वरील कारणास्तव वाटत नाही तसेच सदरचा करार यापुढे देखील सुरू ठेवल्यास मंदिर समितीची प्रतिमा जनसामान्यात मलिन होईल याच्या भाविकांच्या सोयी सुविधांवर परिणाम होऊन त्याचा रोज मंदिर समितीवर येऊ शकतो त्या संदर्भात थेट प्रसार माध्यमातून बातम्या प्रसिद्ध होऊन मंदिर समितीची बदनामी झाली आहे तसेच दिनांक ४ जानेवारी रोजी भटक्या कुत्र्याच्या मंदिरात मुक्त वावर अशा विविध प्रसार माध्यमात बातम्या प्रसिद्ध झालेले आहेत यावरून त्याच्याकडील कर्मचारी प्रामाणिकपणे सेवा देत नसल्याने पुन्हा एकदा दिसून आले त्याम ुळे रक्षक व सिक्युरिटी सर्विसेस अँड सिस्टिम्स प्रा.लि. पुणे ही संस्था करारनामातील अटी व शर्ती अनुसार कामकाज करू शकत नसल्याने आणि वारंवार नोटीस देऊनही त्या संदर्भात योग्य ते खुलासा न सुधारणा होत नसल्याने त्यांच्याशी करण्यात आलेला करार रद्द करण्याक्रम प्राप्त झाले होते असे व्यवस्थापक मनोज शोत्री यांनी यावेळी सांगितले.



# अँटी करप्शन ब्युरो समन्वय समितीची बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा येथील शासकीय विश्रामगृहात रविवार (दि. ५) रोजी अँटी करप्शन ब्युरो समन्वय समितीचे धाराशिव जिल्हा अध्यक्ष अच्युत पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली.

यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली, या बैठकीस अँटी करप्शन ब्युरो समन्वय समितीचे श्रावण वाकळे, मनोज हावळे, ज्ञानेश्वर गुरव, निसार पटेल, आदिनाथ शिंदे, माधव उबाळे यांची उपस्थिती होती.

# स्वेरी आणि सलाम किसान यांच्यात सामंजस्य करार प्रस्थापित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मुंबईच्या 'सलाम किसान'आणि गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित 'स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग' यांच्यातएक महत्त्वाचा सामंजस्य करारस्थापितकरण्यात आला.या कराराचा फायदा ड्रोन तंत्रज्ञानाच्या विकासासाठीतसेचविद्यार्थी व प्राध्यापकांना होणार आहे. स्वेरीच्या माध्यमातून वाढत्या सामंजस्य करारामुळे स्वेरीच्या संशोधन विभागाला आणखी गती येत असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे.




स्वेरी अभियांत्रिकी आणि सलाम किसान मुंबई यांच्यात नुकताच सामंजस्य करार स्थापन झाला असून स्वाक्षरी प्रत दाखविताना डावीकडूनरामचंद्र माशाळे, रोहित पाटील, अक्षय खोब्रागडे, स्वेरीचे संस्थापक सचिव आणि कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे,डॉ. प्रशांत पवार, डॉ. ए.पी. केने, डॉ. मिनाक्षी पवार.

मुंबई मधीलसलाम किसान ही कृषी संबंधित सेवा पुरवणारी आणि ड्रोन तंत्रज्ञानात अनुभव असलेली कंपनी आहे. या करारामुळे सलाम किसान मुंबई ही संस्था महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना'कृषी तंत्रज्ञान'आणि'ड्रोन ऑपरेशन्स'च्या क्षेत्रात आवश्यक असलेले प्रशिक्षण देणार आहे तसेच कंपनीने स्वेरी महाविद्यालयात रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन (आरपीटीओ) प्रमाणित ड्रोन पायलट प्रशिक्षण देखील भविष्यात सुरू करण्याची ग्वाहीयावेळीदिली. या प्रशिक्षणाम ुळे विद्यार्थी आणि प्राध्यापकांना ड्रोन तंत्रज्ञानाच्या बाबतीत व्यावसायिक ज्ञान मिळेल. विशेषतः हा करार कृषी क्षेत्रातील ड्रोन संशोधनाच्या आणि विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.यासामंजस्य करारामुळे स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शिक्षणाचा दर्जा आणखी सुधारण्यास मदत होईल तसेचया कराराच्या मदतीने विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतील ज्यामुळे तेविद्यार्थीकृषी तंत्रज्ञान आणि ड्रोन ऑपरेशन्सयामध्ये उत्कृष्टता साधू शकतील. या सामंजस्य करारावर सलाम किसान मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय खोब्रागडे, विकास अधिकारी रोहित पाटील आणि ट्युटर, एमएसआर आयएएस अकॅडमी, सोलापूरचे रामचंद्र माशाळे वस्वेरी तर्फेस्वेरीचे संस्थापक सचिव आणि कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या करारामुळे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा आणखी सुधारण्यासाठी मदत मिळणार असून कृषी तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली जाणार आहे, हे मात्र नक्की! यासामंजस्यकराराचे स्वागत स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, संशोधन अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, सामंजस्य करार समन्वयिका डॉ. नीता कुलकर्णी इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी केले आहे.

# बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी ९ जानेवारीला जेजुरी नगरपरिषेदे समोर निदर्शने आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर : जेजुरी येथील प्रशासनाने भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या काढून टाकण्यात आलेल्या पुतळ्याचे काम, नवीन जागेत शासनाच्या खर्चाने तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी, पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर प्रेमी व विविध सामाजिक पक्ष संघटनेच्या वतीने गुरुवार दि. ९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ११ वाजता , जेजुरी नगरपरिषद कार्यालय जेजुरी येथे, जाहीर निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.



याबाबतचे निवेदन पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर प्रेमी यांच्या व भिम ानुयायी यांच्या वतीने आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते विष्णूदादा भोसले, यांच्यासह जेजुरी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष बळीराम सोनवणे, समताकृतीचे संपादक दि. चि. कदम ( गुरुजी ) बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष नामदेव नेटके, कोषाध्यक्ष सुनील जगताप, व सामाजिक कार्यकर्ते तानाजी भालेराव, यांनी याबाबतचे निवेदन, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले, पुणे जिल्ह्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी, डॉ. सुहास दिवसे, पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत,व जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाघचौरे यांना, दिले आहे, या निवेदनावर सासवड नगरपरिषद बांधकाम समितीचे माजी सभापती सोपानराव रणपिसे यांनी देखील स्वाक्षरी केली आहे.

१४ जून २०२४ रोजी पुरंदर प्रशासन व नॅशनल हायवे प्राधिकरण प्रशासनाने संगनमताने, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा रस्ता रुंदीकरणाच्या नावावर कुणालाही विश्वासात न घेता एखादा दगड उचलून टाकावा अशा प्रकारे काढून टाकला आहे, या घटनेला जवळपास ७ महिने होत आले आहे तरी आजतागायत प्रशासनाने पुतळ्याचे काम सुरु केले नाही, त्यामुळे जेजुरी नगरपरिषद प्रशासनाने शासकीय खर्चातून घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे, या आंदोलनात पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फ ुले आंबेडकर चळवळीत काम करणाऱ्या सर्व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, भिमसैनिक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत, हे आंदोलन श्रेय वादासाठी नसून, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी आहे, त्यामुळे पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर, संत शिरोमणी रोहिदास महाराज, आद्य क्रांतिवीर उमाजी राजे, नाईक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्यादेवी होळकर, समाज सेविका फातिमा शेख, यांच्या विचार धारेवर काम करणाऱ्या सर्व अनुयायांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहनही आंबेडकरी चळवळीतील नेते विष्णूदादा भोसले यांनी केले आहे.

## पीएसआय शरद शेट्ये यांनी दिली माहिती

## घाटकोपर पश्चिम एल बी एस रोड, पाटीदार हॉल येथे कार्यक्रम संपन्न

# घाटकोपर पोलीस ठाणेच्या विशेष कामगिरीतून गहाळ ३०० मोबाईलचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : घाटकोपर पोलीस ठाणेच्या हद्दी मध्ये गेल्याकाही वर्षात गहाळ झालेल्या ३०० मोबाईल धारकांना तक्रारीनुसार त्यांचे मिळालेले मोबाईल स्वाधीन करण्याचा कार्यक्रम घाटकोपर पश्चिम एल बी एस रोड, पाटीदार हॉल येथे गुरुवार दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते मोबाईल वितरण करण्यात आले. घाटकोपर पोलीस ठाणे अंतर्गत झालेल्या या मोबाईल शोध मोहीम कारवाईमध्ये परीमंडळ ७, मुलुंड पोलीस उप आयुक्त विजयकांत सागर, घाटकोपर विभाग सहायक पोलीस आयुक्त शैलेश पासलवार, घाटकोपर पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते, पोलीस निरीक्षक (गुन्हे ) श्रीमती दिपाली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शना खाली मोबाईल चोरी व मोटार वाहन चोरी प्रतिबंधक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साळुंखे पोह ००२५४/ दिपक भारती, पोह ०६०७३०/ निलेश पवार, पोशि ०९१०१२/ अमोल सूर्यवंशी, पोशि ०९१०१४/अजय अहिरे, पोशि १३०७९३/बाळासाहेब गव्हाणे या पथकाने ३०० मोबाईल चा शोध लावण्यात विशेष कामगिरी केली आहे. घाटकोपर पोलीस ठाणे नोंद हरवलेल्या मोबाईलचा उएखठ या पोर्टलच्या माहितीच्या आधारे, व तांत्रिक कौशल्याचा मानवीय कौशल्य वापर करून माहितीच्या आधारे निरंतर पाठपुरावा करून या मोबाईलचे वापरकर्ता यांचा शोध घेऊन मुंबई तसेच गुजरात, उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार,पश्चिम बंगाल, विविध परराज्यातून एकूण ३०० मोबाईल एकूण किंमत ३७ लाख ७३ हजार रुपयांची मालमत्ता प्राप्त करून तक्रारदार यांना स्वाधीन करण्याचा कार्यक्रम करण्यात आल्याचे पीएसआय शरद शेट्ये यांनी सांगितले.







# ठाकरे शिवसेनेच्या वतीने मिनाताई ठाकरे यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे साहेबांची सावली, तमाम शिवसैनिकांची माऊली मॉ साहेब मीनाताई ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांच्या हस्ते माँसाहेब मिनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी दिनेश जावळे, राहुल मातोळकर, त्र्यंबक गुरुनाथ स्वामी,शंकर रांजणकर, सोमनाथ स्वामी डिगोळकर, खंडू जगताप,दिलीप भांडेकर, एस आर चव्हाण, शिवदास पवार, राधाकिसन गंगणे, परमेश्वर सुर्यवंशी रेणापूर, नारायण माने, नागुअन्ना सुतार, राकेश रणखांब, खंडु जगताप, रुषिकेश पाटील, राहुल रोडे, चंद्रशेखर कालीदास मेटे, दिपक चिंचकर, शेख चांदमिंया सर, सुरेश शिंदे, सगर खाडगावकर, बाळु लड्डा, विखार देशमुख, संतोष माने, हणुमंत पडवळ आदीसह शिवसैनिक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### विवाहितेचा छळ; पतीसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : माहेरून तीन लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा शारीरिक,मानसिक छळ केल्याची घटना ३० डिसेंबर २०२३ ते ६ जानेवारी २०२५ दरम्यान, फिर्यादीच्या सासरी, खंडोबा नगर, सय्यद सोसायटी, बारामतीयेथे घडली. याप्रकरणी तेहरीन अमन शेख (वय-२१,रा.सध्या २५ राजेश कोठे नगर, शेटे वस्ती, यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्यादीने त्यांच्या फिर्यादीवरून पती अमन शेख, रेश्मा नजीर शेख, शबाना शेख, सना मुलानी, इम्रान मुलानी, हिना, हिनाचा नवरा, हर्षद शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी या सासरी असताना वरील संशयित आरोपी यांनी मिळून फिर्यादीस माहेरुन तीन लाख रुपये आणुन अमन शेख यास देत नसल्याचे कारणावरुन सतत शिवीगाळ करुन अन याने दुसरे लग्न लावुन घेण्याची धमकी दिली.तसेच फिर्यादीचा जाचहाट, छळ करुन अमन याने फिर्यादीस माहेरी आणून सोडले असे फिर्यादित नमूद आहे. पुढील तपास पोना.मुलाणी हे करीत आहेत.

# उजनी धरणावर पर्यटन स्थळ होण्यासाठी हालचाली सुरू

## माढाचे आमदार अभिजीत पाटील यांनी केली परिसराची पाहणी, उजनी धरणाचे अधिकाऱ्यांसोबत पार पडली महत्त्वपूर्ण बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा - पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे धडाडीचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या मतदार संघाचे व्हिजन समोर ठेवत विकास झपाट्याने व्हावा. यासाठी आमदारपदी निवडून आल्यापासून प्रयत्न चालविले आहेत. त्यातीलच एक महत्वाच्या म्हणजेच उजनी धरणाच्या पर्यटन स्थळ विकासासाठी हिवाळी अधिवेशनवेळी प्रश्न मांडला होता. त्याची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यावेळी उजनी धरणावरील पाणी सोडण्याचे नियोजन जाणून घेत धरणाची पाहणी केली.





सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणावर पर्यटन स्थळ व्हावे. त्यामुळे मोठे अर्थकारण या भागासाठी उपलब्ध होईल. यासाठी माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांनी नागपूर अधिवेशनामध्ये उजनी धरणावर पर्यटन स्थळ व्हावे. म्हणूनच आवाज उठवला असता, त्यावर तातडीने उजनी धरण भिमानगर येथे उजनी धरणाचे अधिकारी व आ. अभिजीत पाटील व आ. नारायण आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक पार पडली. त्यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी उजनी धरणाचीही आवर्जून पाहणी केली आहे.

**करमाळ्याचे आमदार नारायण आबा पाटील यांचीही होती उपस्थिती**

यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य भारत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे संजय कोकाटे, भारत पाटील, नितीन कापसे, सरपंच प्रमोद कुटे, डीव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, नाना महाडिक, सौदागर जाधव, यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी उपस्थित होते.

# सा. दिव्य गर्जना चे संपादक राजेंद्र कोरके पाटील यांचा आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भूषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई. व पत्रकार हल्ला कृती समितीच्या वतीने आज आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती निमित्त पिंपरीतील ग.दि. माडगूळकर सभागृहात आयोजित केलेल्या सोहळ्यात दिव्यगर्जनाची संपादक राजेंद्र कोरके पाटील यांना सन्मानित एबीपी माझाचे संपादक सरिता कौशिक, सिने अभिनेते किरण माने आणि आमदार अमित गोराखे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव विश्वासराव आरोटे, संजयजी भोकरे, गोविंद वाकडे या अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

यांच्या उपस्थितीत आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती निमित्त राज्यस्तरीय पुरस्कार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.




# किरण आवारे यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक येथील प्रतिष्ठित श्री कालिका देवी संस्थानचा कै.कृष्णराव पाटील कोठावळे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ.सत्यजित तांबे यांचे हस्ते व संस्थांनचे अध्यक्ष अण्णासाहेब पाटील यांचे उपस्थितीत किरणकुमार आवारे यांना प्रदान करण्यात आला.

श्री कालिका देवी मंदिर संस्थान, नाशिक यांचे वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधुन कै. कृष्णराव पाटील कोठावळे पत्रकारिता पुरस्काराचे वितरण करण्यात आले.



दि. ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. श्री कालिका मंदिर सभागृह, जुना आग्रा रोड, नाशिक येथे पुरस्कार वितरण संपन्न झाले. याप्रसंगी आयोजक समितीचे केशवराव (अण्णा) पाटील (अध्यक्ष), सुभाष तळाजीया (कोषाध्यक्ष), डॉ. प्रतापराव कोठावळे (सचिव), अशोक दुधारे (अध्यक्ष) आनंद खरे (सचिव) आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# निफाड महाविद्यालयात पुष्प महोत्सवाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड महाविद्यालयात भव्य असे पुष्प महोत्सवाचे आयोजन वनस्पती शास्त्र विभाग अंतर्गत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला व कल्पकतेला वाव देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले. या महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे(डॉ.) सुरेश जाधव तसेच पत्रकार सर्वश्री राजेंद्र थोरात, राहुल दवते, माणिक देसाई, किशोर सोमवंशी, सागर निकळे, योगेश कर्डिले, राहुल कुलकर्णी या मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच समारोप प्रसंगी देविदास बैरागी व सुनील क्षीरसागर यांची उपस्थिती लाभली. पुष्परचनेत सहभागी झालेल्या एकूण ४३ विद्यार्थ्यांपैकी अनुक्रमे पवार आरती, क्षीरसागर ऋतुजा,सोनवणे प्रतीक यांना बक्षीस मिळाले, तसेच सहभागी झालेल्या ०४ प्राध्यापकांमध्ये अनुक्रमे श्रीमती पी.एन.ठाकरे, प्रा.पी.पी.शार्दुल व श्रीमती बी.बी. ताकाटे यांना प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षिसे मिळाले

या पुष्पमहोत्सवाच्या यशस्वीततेसाठी श्रीमती डी.डी. जेउघाले, आर.डी.आहेर, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र,गणितशास्त्र, या सर्व विभागांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पी.सी.खापरे यांनी केले तर स्पर्धा परीक्षक म्हणून डॉ.आशा कदम यांनी काम पाहिले

# पुणे येथे आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव संमेलनात डॉ. डी. टी. गायकवाड यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

वागदरी/पुणे (एस.के. गायकवाड) : शनिवार दि.४ जानेवारी २०२५ रोजी बहुजन हिताय बहुजन सुखास ग्रुप शिक्रापूर पुणे, भारतीय संविधान विश्लेषण समिती महाराष्ट्र राज्य, द्वारकामाई महिला बालकल्याण मागासवर्गीय विकास संस्था त्रिवेणीनगर पुणे व समिक्षा फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे भारतीय संविधान अमृत महोत्सव संमेलन टिंगरे नगर येथील बौद्ध विहारात आयोजित करण्यात आले होते.





या संमेलनाचे अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या विमल बाबुराव गायकवाड ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष जेष्ठ विचारवंत साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस हे होते.तर यावेळी साहित्यिक राष्ट्रीय प्रबोधनकार प्रा.दि.वा.बागुल,डॉ. डी.टी.गायकवाड, अनंत भवरे, रेखाताई ढेकळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून या संमेलनाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी डॉ.डी.टी.गायकवाड लिखित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जलसंसाधनावरील बीजभाषणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरू संत कबीर या दोन पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत तथा अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सुनिता रोकडे,प्रकाश गायकवाड,लालन शिंदे, विमल गायकवाड, डॉ.प्रिया गायकवाड, राजेश राजगुरू,स्वाती गायकवाड,भारती मोरे आदींचा विशेष सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष सोनवणे यांनी केले तर सुत्रसंचलन सरला उपरवट यांनी केले व आभारप्रदर्शन हर्षनंद सोनवणे यांनी केले. या वेळी डॉ.राजाभाऊ भैलुमे, दिलीप सरोदे, सुप्रिया कासारे, मनोज गजभार, प्राची साळवे, किशोर ढमाले, धनंजय लोखंडे ,एस.के .गायकवाड, चंद्रकांत शिंदे सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ व उच्च शिक्षण विभागाने यांनी संयुक्तपणे अंमली पदार्थाच्या दुष्परिणाम व त्यापासून दूर राहण्याबाबत जनजागृती करावी

# जिल्ह्यात अंमली पदार्थांची तस्करी होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष राहावे : अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/कमलाकर सोनकांबळे : जिल्ह्यात अंमली पदार्थाचे उत्पादन व विक्री होणार नाही या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने अत्यंत तत्पर राहावे. रासायनिक व साखर कारखाने, सर्व मेडिकल स्टोअर्स यांच्यावर ही नियंत्रण ठेवावे. तसेच वेळोवेळी तपासणी मोहीम राबवावी. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारे अंमली पदार्थाची तस्करी होणार नाही या दृष्टीने सर्व संबंधित विभागानी आपापल्या स्तरावरून योग्य दक्षता घ्यावी, असे आवाहन अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केले.

सोलापूर जिल्ह्यात अमंली पदार्थाचे सेवन व वापर तसेच अमंली पदार्थाच्या वापरावर आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डीनेशन (छउजठऊ) समितीची बैठक अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधिक्षक कार्यालय येथे घेण्यात आली. यावेळी पोलीस उप आयुक्त राजन माने, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण ) डॉ. नलीनी टेंभेकर, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क एम.आर पाटील, मिलींद कारंजकर जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या मानसोपचार विभाग (सिव्हिल हॉस्पिटल), डॉ. वडजे सोलापूर विद्यापिठ , अधिक्षक सिमा शुल्क विभाग महेंद्र प्रताप , उपसंचालक औद्योगिक सुरक्षा ओंकार चौरे , जि.प. समाज कल्याण अधिकारी एच. गायकवाड, अधिष्ठाता श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय डॉ. अमित मोरे, अन्न औषध प्रशासन प्रतिनिधी श्री. बिरगे आदी उपस्थित होते.

अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. यावलकर पुढे म्हणाले की, जिल्ह्यात टपाल व खाजगी कुरिअरव्दारे ड्रग्ज, गांजा, खसखस (आफू) अशा पदार्थांच्या ने- आण होते का याबाबत पोलीस विभागाने डॉग स्कॉड व्दारे तपासणी मोहिम घ्यावी. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ व उच्चशिक्षण विभाग यांनी त्यांच्या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच पालकांसाठी जनजागृती पर कार्यक्रम घेऊन अंमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम सांगून त्यापासून दूर राहण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रबोधन करावे असे त्यांनी सुचित केले.

अन्नऔषध प्रशासन विभागाने मेडीकल स्टोअर, रासायनिक कारखाने तसेच साखर कारखाने या ठिकाणी कोणत्याही अंमली पदार्थांचे उत्पादन व विक्री होणार याबाबत दक्षता घेऊन तपासणी करावी. परमिट रूम, बार या ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबवून कठोर कारवाई करावी. जिल्ह्यात महामार्गाचे मोठे झाले निर्माण झालेले आहे त्या अनुषंगाने महामार्ग पोलीस यांनी इतर राज्यांमधून येणाऱ्या वाहनाची विशेषत: मोठे ट्रेलर मधून अंमली पदार्थाची वाहतूक होणार नाही या दृष्टीने उपाययोजना कराव्यात तसेच वेळोवेळी तपासणी मोहीम राबवावी असे निर्देश अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. यावलकर यांनी दिले.

अंमली पदार्थाच्या अनुषंगाने समाज कल्याण विभाग व शिक्षण विभागाने समाजामध्ये व्यसनापासून दूर राहण्याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवावी. समाज कल्याण विभागाने जिल्ह्यातील व्यसनमुक्ती केंद्राना निधी वेळेवर मिळेल या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे श्री. यावलकर यांनी सांगून आरोग्य विभागाकडे या तीन महिन्यात अंमली पदार्थाच्या आहारी गेलेले नवीन व्यसनाधीन उपचार समुपदेशनाची माहिती घेतली.

यावेळी श्री. यावलकर यांनी आरोग्य विभाग ,कृषी विभाग, नॅशनल हायवे, राज्य उत्पादन शुल्क, विद्यापीठ ,महाविद्यालये (उच्च शिक्षण विभाग) , टपाल विभाग, अन्न औषध प्रशासन विभाग, समाज कल्याण विभग (जि. प) ,औद्योगिक विभाग अशा विविध विभागा मार्फत अंमली पदार्थांच्या तस्करी प्रतिबंधाच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शन केले. सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी या अनुषंगाने आपल्या विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती बैठकीत सादर केली.

प्रीतम कुमार यावलकर यांचं फोटो बातमीत घेणे

दैनिक
यश सिद्धि न्यूज

बुधवार दि. ८ जानेवारी २०२५


**थोडक्यात...**




## संगीता जाधव दोन वर्षाकरिता जिल्ह्यातून तडीपार

सोलापूर : बुरखा घालून सोने-चांदी विक्रीच्या दुकानातील कामगारांना बोलण्यामध्ये व्यस्त ठेवून त्यांची नजर चुकवून दागिने चोरी करणे, चोरी करताना त्यांना कोणी पकडल्यास त्यांच्याविरुद्ध विनयभंगाची तक्रार करणे, सोबत आणलेले पुरुषाकडून प्रसंगी मारहाण करणे यासारखे विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असलेल्या संगीता शेखर जाधव (वय-४५,रा.चर्चा जवळ,धोंडीबा वस्ती,रामवाडी) यांना जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्यात आले. दरम्यान, सन २०२३ व २०२४ या काळात शहर परिसरात सोन्या-चांदीचे दागिने चोरणे, विनयभंगाची तक्रार देणे, सोबत आणलेल्या पुरुषांकडून प्रसंगी मारहाण केल्याचे गुन्हे पोलिसात दाखल आहेत.त्यांच्याविरुद्ध जेलरोड पोलीस ठाणे कडून पोलीस उपायुक्त (परिमंडळ) कार्यालयास जाधव यांच्यावर तडीपारची कारवाई करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस उपायुक्त (परिमंडळ) विजय कबाडे यांनी कारवाई करून त्यांच्यावर तडीपार करण्याचे आदेश काढले.संगीता जाधव यांना तडीपार केल्यानंतर ठाणे येथे सोडण्यात आले आहे.

# पत्रकारांच्या लेखणीमुळे तालुक्यात विकासकामे करण्यासाठी मिळाले बळ : आमदार सचिन कल्याणशेट्टी

## दैनिक यश सिद्धी न्यूजचे संपादक कमलाकर सोनकांबळे यांचा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : गेल्या दोन अडीच वर्षांत पत्रकार बांधवांनी तालुक्यातील विकास कामांना प्राधान्य देत वेळो-वेळी विकासकामांच्या बातमीला प्रसिद्धी देत गेल्याने तालुक्यातील विकासकामे मार्गी लागण्यास मदत झाली. तसेच तालुक्यातील विकासकामे करण्यासाठी एक प्रकारचे बळ मिळाल्याचे मत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

दि ६ जानेवारी हा दिवस दर्पणकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन हाच पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो या पत्रकार दिनाचे औचित्य साधून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट येथील भाजप कार्यालयात तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी हे



बोलत होते. यावेळी तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, भाजपचे जेष्ठनेते मल्लिनाथ स्वामी, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, चंद्रकांत दसले व तालुक्यातील सर्व दैनिकाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले की, सन २०२२ ते २०२४ हा काळ माझ्यासाठी अतिशय महत्वाचे होता.याकाळात बर्याच पत्रकारांनी आपल्या प्रकरलेखणीच्या माध्यमातून तालुक्यातील विकासकामांच्या बातम्यांना प्रसिद्धी देत गेल्याने तालुक्यातील विकासकामे करण्यास प्रेरणा मिळत गेली. याच प्रकारे आता पुढील दोन वर्षे ही अतिशय महत्त्वाचे आहेत या पुढील दोन वर्षांत सर्व पत्रकार आणि इतर राजकीय नेत्यांनी विकास कामांना प्राधान्य दिल्यास अक्कलकोट तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्यास मदत होणार असल्याचे सांगितले.

**दैनिक यश सिध्दी न्युजचे संपादक कमलाकर सोनकांबळे यांचे लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी सत्कार करून सन्मान केले.**

यावेळी जेष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर सन्मानाला उत्तर देताना म्हणाले की, तालुक्यात नेहमीच पत्रकारांच्या मानसन्मानासाठी पुढे येणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी आता पत्रकारांच्या भवनासाठी पुढाकार घ्यावा आणि अक्कलकोट समर्थांच्या पुण्यनगरीत पत्रकारांसाठी एक भव्य पत्रकार भवन बांधून देण्याची मागणी करताच सर्वच पत्रकारांनी टाळ्यांच्या गजरात पत्रकार भवनाची मागणी उचलून धरली.

यावेळी पत्रकार मारुती बावडे, आरपीआय चे नेते अविनाश म



डिखांबे, आनंद तानवडे आदींनी मनोगत व्यक्त करीत पत्रकारांना बांधवांना शुभेच्छा दिल्या.यावेळी तालुक्यातील सर्व दैनिकचे पत्रकारांचा यावेळी यथोचित सन्मान करुन गौरव करण्यात आले. यावेळी प्रशांत भगरे, शिवानंद फुलारी, योगेश कबाडे, अरविंद पाटील, रविकांत धनशेट्टी, चेतन जाधव, कमलाकर सोनकांबळे, सोमशेखर जमशेट्टी, नंदू जगदाळे, महेश गायकवाड, स्वामीराव गायकवाड, दयानंद दणुरे रमेश भंडारी, सैदप्पा इंगळे, यशवंत पाटील, शिवा याळवार, शिवानंद गोगाव, रियाज सैय्यद, आदित्य अंबुरे आदी पत्रकार बांधव उप-स्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागेश कलशेट्टी, चंद्रकांत दसले यासह भाजप पदाधिकारी परिश्रम घेतले.




# शारदा क्लासेस व जिजाऊ संस्थेच्या वतीने विज्ञान प्रश्न मंजुषा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पडघा/प्रतिनिधी : शारदा क्लासेस पडघा व जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था , लावण्या फाउंडेशन पडघा यांच्या संयुक्त विद्यमाने . विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण करण्यासाठी सालाबाद प्रमाणे विज्ञान प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन आर. के पालवी इंग्लिश मिडीयम स्कूल पडघा येथे करण्यात आले होते. यावेळी निवृत्त मुख्याध्यापक रावसाहेब कुमावत यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कवी मिलिंद जाधव यांनी आई मला शाळेला जायचं हाय ही कविता सादर केली. तर पंकज भोईर यांनी विज्ञान प्रश्न मंजुषा बाबत अभ्यासातील फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

विज्ञान प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे चौथे वर्ष असून या स्पर्धेत आदर्श विद्यालय कुरुंद ,शारदा विद्यालय पडघा, आर के पालवी इंग्लिश मिडीयम स्कूल (पडघा) ,द .के सूर्यराव विद्यालय (तलवली) , डी .डी. पाटील हायस्कूल (लाप),सरस्वती विद्यालय (चींचवली) यांनी सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेचे पर्यवेक्षक रावसाहेब कुमावत होते. यावेळी आठवीच्या वर्गातून प्रथम - शारदा विद्यालय पडघे

द्वितीय -आर के पालवी स्कूल पडघा, तृतीय -द के सूर्यराव विद्यालयाचे तळवली यांनी पटकावला, नववी मधून

प्रथम - शारदा विद्यालय पडघे, द्वितीय - द के सूर्यराव विद्यालय तळवली, तृतीय - आर के पालवी स्कूल पडघा

यांनी पटकावला. दहावी मधून प्रथम -आर के पालवी स्कूल पडघे, द्वितीय - शारदा विद्यालय पडघे. तृतीय - आदर्श विद्यालय कुरुंद यांनी पटकावला. सर्व विजेत्या विद्यार्थांना सन्मानचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया शेलार यांनी केले. तर सतीश प्रजापती , विलास भोईर , पंकज भोईर यांच्या मार्गर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

# महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड ऑलंपियाड स्पर्धा २०२४ चा आदर्श विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : एम.के,सि.एल मायक्रोलिक कॉम्प्युटर आणि मायक्रोलिंक फाऊंडेशन आयोजित महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड ऑलंपियाड स्पर्धा २०२४ चा आदर्श विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा मायक्रोलिंक कॉम्प्युटर सेंटर घाटकोपर पश्चिम याठिकाणी पार पडला.

यावेळी सार्थक आढळराव, श्रवण यादव, सार्थक हडवले, संचित पाटील, लेखा कांबळे, मानसी कणेरी, वेदांत गायकवाड, श्रावणी जाधव, साक्षी महाबदी, समीक्षा कोरडे, वैभवी कोटकर, श्रेया मोरे, मंदार सैदाणे, वेदिका वाणी, सिद्धी कांबळे, रिया सकपाळ, देवांग भालेराव, आराध्य राऊत, अनुष्का कदम, सोनल कदम, प्रसाद पवार यांना मायक्रोलिक कॉम्प्युटर, मायक्रोलिंक फाऊंडेशनचे अध्यक्ष व संस्थापक सचिन मनवळ यांच्या हस्ते आदर्श विद्यार्थी २०२४ ने सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




# भारतीय पत्रकारितेला समाजसेवेचा वारसा : तहसीलदार विशाल नाईकवाडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पश्चिमात्य देशात माध्यमात निमोसेक्शन हा प्रकार असून बातमीला क्रयशक्ती किंवा क्रयवस्तू म्हणून पहिले जाते, तिचा वापर व्यापार उदीमसाठी केला जातो. जेव्हडी बातमी जास्त ताजी तेव्हडा व्यापार वाढविण्यासाठी तिचा फायदा होतो. मात्र, भारतीय पत्रकारितेला समाजसेवेचा वारसा आहे. इंग्रजांबरोबर



लढताना पत्रकारितेत व्यक्ती स्वातंत्र्य, समाज सुधारणेला महत्व दिले गेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांनी वृत्तपत्र, मासिक यातून समाजसेवेचे काम सुरु केले. शासनाच्या म्हत्वाकांक्षी योजना, प्रकल्प जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करत असतात. कोरोना काळात पत्रकारांनी जीव धोक्यात घालून पत्रकारिता केली. निवडणूक काळात देखील पत्रकारांचे अनमोल सहकार्य लाभले. पत्रकार धकाधकीचे जीवन जगत असतात. त्यासाठी ते दिवसरात्र मेहनत करत असतात. बातमीला वेळ नसतो. पत्रकाराला २४ तास काम असते. त्यामुळे त्यांचे आरोग्य जपण्यासाठी पत्रकारांची आरोग्य चाचणीचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन निफाडचे तह-सीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले.

दि.६ जानेवारी रोजी पत्रकार दिन तथा दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जयंती निमित्त महसुल प्रशासनाच्या वतीने पत्रकार दिन व आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक आणि एच.एल.एल.लॅब यांच्या संयुक्त विद्यमानाने पत्रकारांसाठी १३८ प्रकारच्या चाचण्या उपलब्ध करून देण्यात आल्या. इंडियन मेडिकल असोशियन यांचेमार्फत वैद्यकीय तज्ञ उपलब्ध राहून पत्रकारांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार अरुण खांगळ तर व्यासपीठावर नायब तह-सीलदार दिपाली खेडकर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.सुजित कोशिरे, उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ. राजीव तांबाळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार अरुण खांगळ, व्यासपीठावर शेखर देसाई, हारूनभाई शेख, ग्रा.प.विस्तार अधिकारी प्रशांत बोरसे उपस्थित होते. याप्रसंगी तालुक्यातील सर्व पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाजीराव कमानकर यांनी तर प्रास्तविक निलेश देसाई यांनी मांडले.

**पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई**

**मुद्देमाल व हातभट्टी दारू तयार करण्याचे साहित्य जप्त**

# विटे येथे हाटभट्टी दारू अड्ड्यावर तालुका पोलिसांचा छापा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील विटे गावच्या एका शेतात मोकळ्या जागेत झाडीमध्ये अवैध हातभट्टी अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली. त्यामध्ये एकूण ४०० लिटर हातभट्टी दारू, किंमत ४० हजार, रुपये किंमत व १८०० लिटर गुळमिश्रित रसायन ६३हजार- असे एकूण एक लाख तीन हजार रु किमतीचा मुद्देमाल व हातभट्टी दारू तयार करण्याचे साहित्य पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केले आहे.

सदर जागेच्या शेतमालकाविरुद्ध व दारू विकणाऱ्या व्यक्तीविरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई श्री अतुल कुलकर्णी सो पोलिस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उप विभागीय




अधिकारी डॉ अर्जुन भोसले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक टी वाय मुजावर, तालुका पोलीस स्टेशन भारत भोसले पोलीस उपनिरीक्षक गजानन माळी पोलीस हेडकॉन्स्टेबल, विनायक क्षीरसागर पोलीस हेडकॉन्स्टेबल अमोल गावडे पोलीस कॉन्स्टेबल, हूसेन नदाफ पोलीस कॉन्स्टेबल या पथकांनी केली.

# गदगेप्पा धबाले यांचे हृदयविकाराने निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : गदगेप्पा शेंकरेप्पा धबाले (वय ६१, बसव कल्याण) गदगेप्पा शंकरेप्पा धबाले, ६१, बसवकल्याण तालुक्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक होते.

सोमवारी दुपारी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. अक्कलकोट खेडगी महाविद्यालय कन्नड विभाग प्रमुख डॉ. गुरालिंगप्प धाबले यांचे मोठा भाऊ होते.

